ला.प्र.वि.नंदुरबार
दिनांक १२/०६/२०२०.

:—प्रेस नोट :—

आलोसे बबन काशिराम जगदाळे वय—५६ नेमणुक उपविभागीय अधिकारी अभियंता जि.प.बांधकाम उपविभाग नंदुरबार (वर्ग—१) जि.नंदुरबार यांना ८५,०००/—रुपये लाचेची मागणी करुन ती स्विकारतांना रंगेहात पकडले बाबत

| | |
|---|---|
| घटक | नंदुरबार |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | बबन काशिराम जगदाळे वय—५६ नेमणुक उपविभागीय अधिकारी अभियंता जि.प.बांधकाम उपविभाग नंदुरबार (वर्ग—१),जिल्हा नंदुरबार |
| मगणी केलेली लाचेची रक्कम | ८५०००/—रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ८५०००/—रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील मुळ तक्रारदार हे बांधकाम ठेकेदार असुन त्यांनी जिल्हा परिषद,नंदुरबार अंतर्गत मौजे पिंपरीपाडा ता. नंदुरबार,येथे रस्त्यांवर स्लॅप ड्रेन (पुल) तसेच जिल्हा परिषद दुरुस्तीचे कामे,व नंदुरबार पंचायत समिती दुरुस्तीचे शासकीय कामांचे ठेके घेवुन कामे केले असुन सदरचे कामे पुर्ण झाले असुन त्या सर्व कामांचे एकुण बिले अंदाजे ४४,००,०००/—रु. देखिल मिळाले आहेत. तक्रारदार यांनी केलेल्या कामांवर देखरेख करणारे बबन जगदाळे उपअभियंता पंचायत समिती,नंदुरबार हे होते त्यांनी तक्रारदार यांचेकडुन वरील कामांचे झालेले बिलांचे मोबदल्यात २.५ टक्के प्रमाणे १,०५,०००/— रुपये लाचेची मागणी केली होती. त्यापैकी तक्रारदार यांनी दोन दिवसापुर्वी आरोपी लोकसेवक बबन जगदाळे उपअभियंता यांना २०,०००/—रु. दिलेले होते. उर्वरीत राहिलेली रक्कम ८५,०००/— रुपये तक्रारदार यांना लाच म्हणुन दयावयाची इच्छा नसल्याने त्यांनी ॲकब्यु, नंदुरबार कार्यालयास दिनांक ११/०६/२०२० रोजी लेखी तक्रार दिलेवरुन पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक जगदाळे यांना वरीलप्रमाणे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले होते. त्यावरुन आरोपी लोकसेवक उपअभियंता बबनराव जगदाळे ,नंदुरबार पंचायत समिती यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम आज दिनांक १२/०६/२०२० रोजी पंच व साक्षीदार यांच्या समक्ष पंचायत समिती,नंदुरबार येथील बांधकाम विभागातील त्यांचे कार्यालयात स्विकारली असुन त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्या येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.

Scanned with CamScanner

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नंदुरबार कार्यालय
संकेतस्थळ : acbnandurbar@gmail.com
ई–मेल : dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbnandurbar@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १०६४
दुरध्वनी क्रमांक : ०२५६४– २३०००९,२३१००९
व्हॉटस ॲप क्र. : ९५९४४०१७७७

12.06.2020

(शिरीष.टी.जाधव)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नंदुरबार

पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग * नंदुरबार *

Scanned with CamScanner